# कंत्राटी प्राध्यापकांना तीन महिन्यांची मुदतवाढ

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २२ : शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेत कंत्राटी प्राध्यापकांना (हंगामी सहायक प्राध्यापक) तीन महिन्यांची मुदतवाढ दिली आहे. पुढील नियुक्तीबाबत नवे कुलगुरू आल्यानंतर निर्णय घेण्यात येणार आहे.

विद्यापीठात कंत्राटी की सीएचबी प्राध्यापकांची नियुक्ती करायची, या विषयावर चर्चा सुरू होती. प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी त्यासंबंधी निर्णय घेण्यासाठी एक समिती नियुक्त केली होती. समितीने अहवाल सादर केल्यानंतर व्यवस्थापन परिषदेत विषयावर चर्चा झाली. समितीतील तीन सदस्यांचे कंत्राटी प्राध्यापकांच्या बाजूने झुकते माप असताना एका सदस्याने कंत्राटी प्राध्यापकांविरोधात भूमिका घेतल्याचे समजते. डॉ. करमळकर यांनी विशेषाधिकारात कंत्राटी प्राध्यापकांना तीन महिन्यांसाठी मुदतवाढ दिली. तसेच त्यांच्या पुढील नियुक्तीबाबतचा निर्णय नवे कुलगुरू घेतील, असे स्पष्ट केले. विद्यापीठाच्या अधिविभागांत कामकाजासाठी पुरेसे प्राध्यापक उपलब्ध नाहीत. कंत्राटी प्राध्यापक तीन महिने काम करण्यास तूर्त अनुकूल असले तरी त्यांच्यात अस्वस्थता कायम आहे. सीएचबी प्राध्यापक विद्यापीठात नियुक्त करण्याचा विचार शिक्षण क्षेत्रातील काही घटकांना मान्य नाही. हा अट्टहास कशासाठी, हा प्रश्नही त्यांच्यासमोर आहे. तसेच सीएचबी प्राध्यापक नियुक्तीला पाठिंबा देणाऱ्यांचा उद्देशही समजेनासा झाला आहे.

लोकमत

शिवाजी विद्यापीठात संशोधन । व्यापक निर्मितीसाठी उद्योग समूहांशी संपर्क

# स्पर्शविरहित तापमापक यंत्राची निर्मिती

"कोरोनाच्या वाढत्या प्रसाराच्या काळात रोगाचे संक्रमण टाळण्यासाठी या यंत्राचा चांगला उपयोग होणार आहे. या यंत्राच्या व्यापक निर्मितीसाठी विद्यापीठाने काही उद्योग समूहांशी संपर्क साधला आहे. त्यालाही प्रतिसाद लाभेल. या यंत्राच्या संशोधनासाठी अधिविभागाचे संचालक प्रा. डॉ. प्रमोद पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

- **डॉ. तुकाराम डोंगळे,** सहायक प्राध्यापक, शिवाजी विद्यापीठ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोरोनाविरोधातील लढ्यात उपयुक्त ठरणाऱ्या स्पर्शविरहित स्वयंचलित तापमापक यंत्राची निर्मिती शिवाजी विद्यापीठात झाली आहे. विद्यापीठातील नॅनो सायन्स व तंत्रज्ञान अधिविभागातील सहायक प्राध्यापक डॉ. तुकाराम डोंगळे यांनी इचलकरंजीतील प्रा. परेश मट्टीकल्ली यांच्या सहकार्याने हे यंत्र विकसित केले आहे.

स्पर्शविरहित स्वयंचलित तापमापक उपकरणाची कार्यप्रणाली ही जागतिक आरोग्य संघटनेने कोविडसाठी ठरवून दिलेल्या मानकांवर आधारलेली आहे. त्यानुसार एखाद्या व्यक्तीच्या तापमानाची नोंद निर्धारित तापमानापेक्षा अधिक झाली, तर हे उपकरण अलार्मच्या माध्यमातून त्याची सूचना देते, जेणेकरून पुढील योग्य त्या दक्षतेसाठी त्याची मदत होते. मुख्यत: हे यंत्र कोविड योद्ध्यांमध्ये वाढणाऱ्या संक्रमणाला आळा घालण्यासाठीच्या प्रतिबंधात्मक गरजा लक्षात घेऊन विकसित केले आहे.

## असे काम करते यंत्र

- या यंत्रामध्ये अल्ट्रासोनिक आणि इन्फ्रारेड सेन्सर्स वापरले आहेत. अल्ट्रासोनिक सेन्सर समोर आलेली व्यक्ती आणि यंत्रामधले अंतर ओळखते आणि मायक्रो कंट्रोलरला संकेत पाठविते. मायक्रो कंट्रोलर पुढे इन्फ्रारेड सेन्सरला त्या व्यक्तीचे तापमान मोजण्यासाठी एक संकेत पाठविते. त्यानुसार सेन्सरी डेटा मिळाल्यानंतर मायक्रो कंट्रोलरमध्ये त्या डेटावर प्रक्रिया होऊन एलसीडी डिस्प्लेवर संबंधित व्यक्तीचे तापमान दर्शविले जाते.




- व्यक्तीचे तापमान जागतिक आरोग्य संघटनेच्या निधारित निकष पायरीहून अधिक नोंद झाले असेल तर लगेच अलार्म वाजतो आणि लाल रंगाची एलईडी लाईट लागते. हे यंत्र मानवी हस्तक्षेपाशिवाय चालत असल्याने एका व्यक्तीकडून दुसऱ्याकडे होणारे रोगसंक्रमण टाळण्यासाठी उपकरण उपयुक्त ठरते.